# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ७२ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१२९७ : योगी चांगदेवाने पुणतांबे येथे समाधी घेतली.
१७७५ : विद्युत कंपनाचे मापन करण्याचे उपकरण अ‍ॅमिटर हे शोधून काढणारा संशोधक आंद्रेमारी यांचा जन्मदिन.
१८७१ : रतनजी टाटा यांचा जन्मदिन.
१९३० : बटुकेश्वर दत्त यांचे निधन झाले.

सेन्सेक्स ८३,२४६.१८ -३२४.१७ (०.३९%)
डॉलर ₹ ९०.८८

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)


| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १३ |
| दिल्ली | २३ | ११ |
| मुंबई | ३१ | १७ |
| नागपूर | २९ | १५ |
| पुणे | ३० | ०९ |

# संरक्षण उत्पादनात खासगी क्षेत्राचा वाटा ५० टक्क्यांपेक्षा अधिक वाढवण्याचा विचार

## ● संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची घोषणा!

वृत्तसंस्था । नागपूर

**देश खासगी क्षेत्राच्या मदतीने दारूगोळा उत्पादनात सातत्याने प्रगती करत असून दर्जेदार आणि विश्वसनीय उत्पादने तयार करत आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात सरकार संरक्षण उत्पादनातील खाजगी क्षेत्राचा वाटा ५० टक्के किंवा त्याहून अधिक होईल वाढवण्याचा केंद्र सरकार विचार करीत आहे. खाजगी क्षेत्र त्यांची क्षमता आणि नवोपक्रम पूर्णपणे स्पष्ट दर्शवतात, अशी माहिती केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी दिली.**




राजनाथ सिंह यांनी नागपूर येथील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडमध्ये मध्यम क्षमतेच्या दारूगोळा निर्मिती केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. तसेच यावेळी आर्मेनियासाठी गाईडेड पिनाका रॉकेटच्या पहिल्या तुकडीला हिरवी झेंडी दाखवण्यात आली.

यावेळी सोलर इंडस्ट्रीजचे अध्यक्ष सत्यनारायण नुवाल, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनवण्यात खाजगी क्षेत्राच्या योगदानाचे सिंह यांनी कौतूक केले. तसेच २०२१ मध्ये भारतीय लष्कराला सुपूर्द करण्यात आलेल्या खाजगी क्षेत्राद्वारे उत्पादित पूर्णपणे भारतीय बनावटीच्या मल्टी-मोड हँड ग्रेनेडचा त्यांनी विशेष उल्लेख केला. पुढे सांगितले की, सोलर ग्रुपने तयार केलेले नागास्त्र ड्रोन ऑपरेशन सिंदूर दरम्यान वापरले (पान २ वर)

### ➤ संरक्षण निर्यात २४ हजार कोटींपर्यंत

आत्मनिर्भरतेच्या दिशेने सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे मिळालेल्या परिणामांची माहिती देताना संरक्षणमंत्र्यांनी सांगितले की, देशांतर्गत संरक्षण उत्पादन २०१४ मध्ये केवळ ४६ हजार ४२५ कोटी रुपये होते. त्यात विक्रमी वाढ होऊन सुमारे १.५१ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहचले आहे. या योगदानापैकी ३३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त वाटा खाजगी क्षेत्राचा आहे. खाजगी उद्योग आत्मनिर्भर भारताचे ध्येय साध्य करण्यात भागीदार बनत असल्यचेही ते म्हणाले. खासगी क्षेत्रामुळे भारताची संरक्षण निर्यात दहा वर्षांपूर्वी १ हजार कोटी रुपयांपेक्षा कमी होती. ती आता २४ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचे सिंह यांनी सांगितले.

**सुविचार**

प्रत्येक सकाळ ही आयुष्य बदलण्यासाठी एक संधी आहे.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०७ संध्या-६:१०

**सोने - चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,४७,७८०/- ३,०५,०००/-

**केळी भाव**

नवती : ७५१ ते ७७०
पिल बाग : २५१ ते २७०
कांदे बाग : ----

# अखिल भारतीय किसान सभेचे आंदोलन पेटले!

## महाराष्ट्र-गुजरात महामार्गांवरील वाहतूक झाली विस्कळीत

वृत्तसंस्था । नाशिक

**शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेने सुरू केलेल्या आंदोलनामुळे जिल्ह्यातील अनेक महामार्गांवरील वाहतूक विस्कळीत झाली आहे. सुरगाणा, पेठ, दिंडोरी आदी भागात आंदोलक रस्त्यावर उतरल्याने महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांना जोडणाऱ्या दिंडोरी-सापुतारा या मार्गांवरील वाहतूक वळवण्यात आली. तर नाशिक-पेठ-धरमपूर (गुजरात) मार्गावर अडकलेल्या शेकडो वाहनांना पोलिसांनी हस्तक्षेप मार्ग मोकळा करून दिला. या मार्गावरील वाहतूक संथ आहे. आंदोलनामुळे हरसूल व सुरगाणा भागातही वाहतूक वळवण्यात आल्याचे ग्रामीण पोलिसांनी म्हटले आहे.**



अखिल भारतीय किसान सभा आणि माकपच्यावतीने तालुकानिहाय आंदोलन सुरू केलेल्या आंदोलनाचा प्रभाव आदिवासी तालुक्यात अधिक्याने दिसत आहे. सुरगाणा, पेठ, त्र्यंबकेश्वर हे तीन तालुके टंचाईगस्त आहेत. या भागातील पश्चिमी वाहिनी नद्या व उपनद्यांवर मोठ्या आकाराचे बंधारे बांधून त्यांचे पाणी स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीला द्यावे, वनपट्टेधारकांचे क्षेत्र ४० आरपेक्षा कमी असल्याने शासकीय योजनांचे लाभ घेता येत नाहीत. त्यामुळे कब्जे वहिवाटीतील चार हेक्टरपर्यंतच्या क्षेत्राची मोजणी करून भूखंड मंजूर करावा व त्याचा सातबारा तयार करावा, अपात्र वनदाव्यांची फेरचौकशी करून दावे पात्र करणे, वनपट्टेधारकांच्या कृषिमालाची हमी भावाने खरेदी करणे आदी मागण्यांकडे आंदोलनातून लक्ष वेधण्यात आले. किसान सभेचा आदिवासी तालुक्यात प्रभाव आहे. या भागात (पान २ वर)

● **महाराष्ट्र व गुजरातला जोडणारे नाशिक-पेठ आणि नाशिक-वणीमार्गे सापुतारा या दोन्ही राष्ट्रीय महामार्गांवरील वाहतुकीवर आंदोलनाचा परिणाम झाला. नाशिक-पेठ रस्तावरील बेमुदत रास्ता रोको आंदोलनामुळे रविवारी दोन्ही बाजुला शेकडो वाहने अडकून पडली होती. प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. रात्रीही मोर्चेकरी ठाण मांडून बसल्याचे सांगितले जाते.**

# भुसावळमध्ये ३० हजार लिटर्स संशयास्पद इंधन साठा जप्त!



प्रतिनिधी । भुसावळ

**शहरालगतच्या औद्योगिक वसाहतीत एका खासगी कंपनीच्या आवारात उभ्या असलेल्या टॅकरमध्ये सुमारे ३० हजार लिटर्स संशयास्पद इंधन साठा आढळून आला. भुसावळ तालुका पोलीस आणि पुरवठा विभागाने केलेल्या संयुक्त कारवाईत सुमारे ३६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

भुसावळ तालुका पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेला शहरालगतच्या किन्ही औद्योगिक वसाहतीतील नमो एनर्जी ऑईल कंपनीत संशयास्पद हालचाली सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. कंपनीच्या आवारात डिझेलसारखा ज्वलनशील पदार्थ बेकायदेशीररीत्या साठवण्यात आल्याची शक्यता व्यक्त होताच पोलीस आणि पुरवठा विभागाने तातडीने कारवाईचा निर्णय घेतला. तहसीलदारांच्या आदेशान्वये पुरवठा निरीक्षण अधिकारी रोशना रेवतकर, भुसावळ तालुका पोलिस ठाण्याच्या उपनिरीक्षक पूजा अंधारे आणि त्यांच्या पथकाने पंचासमक्ष रविवारी संबंधित कंपनीच्या आवारात छापा टाकला. छाप्यादरम्यान जीजे-२४ व्ही-७६५५ क्रमांकाचा एक टँकर संशयास्पद अवस्थेत उभा असल्याचे आढळून आले.

पथकाने टँकरच्या व्हॉल्वमधून द्रव पदार्थ काढून तपासणी केल्यावर त्यास डिझेलसारखा उग्र वास येत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे हा पदार्थ डिझेल किंवा तत्सम ज्वलनशील इंधन असल्याचा प्राथमिक अंदाज अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. या कारवाईदरम्यान टँकर ताब्यात घेण्यात आला असून, संबंधित कंपनीतील कागदपत्रांची तपासणी (पान २ वर)

## थोडक्यात

### भारत-पाकिस्तान एकाच दिवशी दोन सामने खेळणार

**मुंबई ।** भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ जेव्हा जेव्हा आमने सामने येतात तेव्हा क्रिकेट चाहत्यांना हाय व्होल्टेज सामना पाहायला मिळत असतो. गेल्यावेळी हे दोन्ही संघ आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी विजय मिळवून जेतेपदाचा मान पटकावला होता. आता क्रिकेट चाहत्यांना पुन्हा एकदा भारत-पाकिस्तान सामन्याचा थरारा पाहायला मिळणार आहे.

### राज्यात पुन्हा थंडीचा कडाका वाढणार

**मुंबई ।** नववर्षाच्या प्रारंभी झालेल्या अवकाळी पावसानंतर राज्यातील हवामान सतत बदलत होत आहे. आता पुन्हा एकदा राज्यात थंडी वाढली असून पुढचे काही दिवस थंडीचा कडाका वाढणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. विशेषत: उत्तर महाराष्ट्र किमान तापमानात लक्षणीय घट होण्याची शक्यता असून पुढील काही दिवस पहाटे आणि रात्री कडाक्याची थंडी जाणवू शकते. विभागाच्या माहितीनुसार, उत्तर महाराष्ट्रात काही भागांत तापमानात ३ ते ४ अंश सेल्सिअसपर्यंत घटण्याची शक्यता आहे.

# दहावी-बारावी परीक्षेत केंद्र संचालक व कर्मचाऱ्यांची सरमिसळ करणार नाही

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या १० वी व १२ वीच्या शालांत परीक्षांमध्ये कोणत्याही प्रकारे केंद्र संचालक, पर्यवेक्षक व कर्मचाऱ्यांची दुसऱ्या परीक्षा केंद्रावर अदलाबदल किंवा सरमिसळ केली जाणार नाही, असे पुणे विभागीय मंडळाचे अध्यक्ष औदुंबर उकिरडे यांनी स्पष्ट केले आहे.**



अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय मुख्याध्यापकांच्या कार्यशाळेत बोलताना त्यांनी ही बाब स्पष्ट केली. यावेळी श्री. उकिरडे म्हणाले की, प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांना आपापल्या शाळेची संपूर्ण माहिती असते. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया अधिक सुलभ व सुरळीतपणे पार पडते. हे लक्षात घेऊन मुख्याध्यापक संघाने केलेल्या मागणीनुसार मंडळाने हा निर्णय (पान २ वर)

# धुळे महापालिकेत भाजपला स्पष्ट बहुमत मिळाल्याने महापौरपदासह विविध समित्यांच्या सभापतीपदाचे लागले वेध

प्रतिनिधी । धुळे

**महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल जाहीर होऊन चार दिवस उलटले असले, तरी ७४ पैकी ५० जागा जिंकूनही केवळ महापौरपदाचे आरक्षण जाहीर न झाल्याने स्पष्ट बहुमत मिळविलेल्या भाजपाची सत्ता स्थापनेची प्रक्रिया रखडली आहे.निवडणूक निकालानंतर महापालिकेच्या सत्तास्थापनेसाठी औपचारिक हालचाली सुरू होणे अपेक्षित होते.**




मात्र, शासनाकडून महापौरपदाचे आरक्षण अद्याप जाहीर न झाल्याने महापौर व उपमहापौर निवड, तसेच पुढील सत्तारचना प्रक्रिया पुढे सरकलेली नाही. सत्ता निर्विवाद असतानाही प्रत्यक्ष कारभाराची सूत्रे हाती येण्यास विलंब होणार असल्याचे चित्र सध्या स्पष्ट झाले आहे.

महापालिकेच्या कायदेशीर प्रक्रियेनुसार महापौर निवडीपूर्वी महापौरपदाचे आरक्षण जाहीर होणे अनिवार्य आहे. आरक्षण स्पष्ट झाल्याशिवाय महापौर निवडीसाठी विशेष सभा बोलावता येत नाही. त्यामुळे आरक्षणाचा निर्णय हा सत्तास्थापनेचा पहिला आणि निर्णायक टप्पा मानला जातो. सध्या हाच टप्पा रखडल्याने संपूर्ण प्रक्रिया थांबली आहे. गेल्या पंचवार्षिक कार्यकाळात महापौरपद पहिल्या अडीच वर्षांसाठी सर्वसाधारण प्रवर्गासाठी, तर उर्वरित अडीच वर्षांसाठी ओबीसी (पान २ वर)

# जळगावमधील गिरणा नदीवरील पुलासाठी ७९ कोटींचा निधी मंजूर!

## बांभोरी पुलाच्या बांधकामासाठी केंद्र सरकारकडून निधी, वाहतूक कोंडीची समस्या सुटणार : खा.स्मिता वाघ

प्रतिनिधी । जळगाव

**शहरालगत गिरणा नदीवरील बांभोरी पुलाच्या बांधकामासाठी केंद्र सरकारकडून सुमारे ७९ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर झाला असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीच्या समस्येतून सुटका होणार आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हे काम करण्यात येणार असल्याची माहिती खासदार स्मिता वाघ यांनी दिली आहे.**

जळगाव लोकसभा मतदारसंघातील पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी खासदार स्मिता वाघ सातत्याने पाठपुरावा करत आहेत. गिरणा नदीवरील सध्याचा पूल जीर्ण अवस्थेत असून वाढत्या वाहतूक कोंडीमुळे तो वाहनधारकांच्या डोक्याला मोठा ताप ठरला होता.

यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडी, अपघातांचा धोका तसेच वेळेचा अपव्यय सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर जुन्या पुलाच्या जागी नवीन, मजबूत आणि आधुनिक पूल उभारण्याची मागणी खासदार वाघ यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने लावून धरली होती. त्यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून, गिरणा पुलाच्या बांधकामासाठी ७९ कोटी २३ लाख ३९ हजार ६४८ रुपयांचा निधी (पान २ वर)



### ➤ जुन्या पुलाची विशेष दुरुस्ती

नवीन पुलाच्या बांधकामासोबतच सध्याच्या जुन्या पुलाची विशेष दुरुस्ती व मजबुतीकरण करण्यात येणार आहे. याशिवाय कालिंका माता मंदिर ते खोटेनगर रस्त्याचे व्हाईट टॉपिंग पद्धतीने काँक्रिटीकरण, आरसीसी गटारीचे बांधकाम तसेच इतर पूरक विकास कामांनाही गती मिळणार आहे. या सर्व कामांमुळे शहरातील अंतर्गत रस्ते अधिक सुस्थितीत येऊन नागरिकांना सुरक्षित व सुलभ प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. गिरणा नदीवरील जुन्या पुलास समांतर असणाऱ्या बांभोरी आणि निमखेडी दरम्यानच्या नवीन पुलाचे कामही काही महिन्यांपासून सुरू आहे. त्याच्या बांधकामासाठीही सुमारे ४० कोटी रूपयांचा निधी मंजूर आहे.

# भाजप 'ना कामाचे, ना रामाचे' काँग्रेसची टीका

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

ज्योतिर्पीठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांना प्रयागराज येथे स्नानासाठी जाण्यापासून रोखल्याच्या घटनेवरून काँग्रेसने केंद्र सरकार आणि भारतीय जनता पक्षावर टीका केली. भाजपला केवळ सत्ता आणि पैशाचा हव्यास असून त्यांना धर्म किंवा श्रद्धेशी काहीही देणेघेणे नाही, असा आरोप करत काँग्रेसने 'ये ना काम के हैं, ना राम के हैं' अशा शब्दांत भाजपचा समाचार घेतला. या घटनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणीही पक्षाने केली आहे.

## संपादकीय

### ॲग्री होमिओपॅथीचा नवा प्रवाह

कृषी क्षेत्रात होमिओपॅथीचा यशस्वीपणे वापर केला तर अनेक समस्यांवर तोडगा काढणे शक्य होईल. ही पद्धत नजिकच्या काळात रासायनिक किटकनाशके आणि खताला पर्याय देणारी ठरू शकते. या माध्यमातून पिकांच्या उत्पादनात वाढ, किडीचा प्रार्दूभाव रोखणेआणि कृषी क्षेत्राचा सर्वंकष विकास करण्यासाठी उपयुक्त माध्यम ठरू शकते. भारतात यादृष्टीने अनेक संशोधन केले जात असून प्रयोगही केले जात आहेत. जाणकारांच्या मते, या पद्धतीत रोपट्यांना अंतर्गत रुपातून मजबूत करण्यावर भर दिला जातो. जेणेकरून नैसर्गिक रुपाने रोगराईचा मुकाबला करणे शक्य होते. कृषी होमिओपॅथीमुळे मातीत मिसळल्या जाणार्या रासायनिक खतांमुळे होणारे नुकसान टाळले जाते, मातीतील अवशेषांचा समूळ नायनाट होतो आणि शेवटी मातीची सुपिकता वाढण्यास मदत होते. महागड्या आणि पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत कमी असणारा खर्च. यामुळे कृषी क्षेत्रात होमिओपथीचा वापर हा नक्कीच क्रांतिकारी पाऊल ठरू शकतो. ॲग्री होमिओपॅथी रोपट्यांना सक्षम करण्याबरोबरच अंतर्गत प्रक्रिया देखील मजबूत करते. रोपट्यांची सर्वंकष वाढ होऊन ते नैसर्गिक रुपाने देखील आपोआप किडीचा सामना करण्यास सक्षम बनतात. या सुविधेमुळे महागड्या आणि गरजेच्या वेळी उपलब्ध न होणार्या रासायनिक खतांचा वापर करण्याची गरज भासत नाही. एखाद्या आजाराला मुळासकट काढण्याचे काम होमिओपॅथी उपचार पद्धतीत आहे. तीच मात्रा इथेही लागू केली जाईल. हाच सिद्धांत माती आणि रोपट्यांना लागू होतो. होमिओपॅथी ही अनुवांशिक हालचाली आणि चयापचय म्हणजेच ङ्गमेटाबालिज्ममच्या बदलातील प्रक्रियेला प्रोत्साहित करून पिकांची प्रतिकार शक्ती वाढवण्यास मदत करते. कृषी क्षेत्रात होमिओपॅथी औषधांचा वापर अनेक दशकांपासून होत आहे आणि तो यशस्वीही ठरला आहे. मात्र त्याचा वापर मर्यादित आहे. पण आता यासंदर्भात जगभरात संशोधन वाढले असून लोकांना त्याविषयी जिज्ञासा वाढली आहे. एखादा रुग्ण होमिओपॅथी डॉक्टरकडे जातो तेव्हा त्याच्यावर परिणामकारक उपचार केले जातात आणि त्या आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचा प्रयत्न होतो. हाच मार्ग कृषी क्षेत्राने देखील स्वीकारला आहे. यानुसार जागतिक पातळीवर होमिओपॅथीचे नवे रूप म्हणून ङ्गॲग्रो होमिओपॅथीफ्कडे पाहता येईल आणि भविष्यात शेतीचे आरोग्य सुधारण्यासाठी एक सक्षम पर्याय म्हणून समोर येऊ शकेल. पाण्याच्या थेंबात सामावलेले होमिओपॅथी औषध हे शेती व शेतकर्यांसाठी आरोग्यदायी आणि उपयुक्त ठरू शकते. कमी खर्चाचे होमिओपॅथी औषध हे भविष्यात पानाफुलांवर अवलंबून असणार्या जीवजंतूंना देखील उपकारक ठरेल. रासायनिक पदार्थामुळे त्यांचा जीव गुदमरत असताना होमिओपॅथी औषध त्यांना जीवदान देण्याचे काम करेल. भारतात होमिओपॅथी औषधांच्या अनेक ठिकाणी चाचण्या झाल्या. होमिओपॅथी औषधे ही रोगप्रतिकारक शक्ती विकसित करतात. कृषी होमिओपॅथी मातीचे आरोग्य आणि सुपिकता कायम ठेवत रोपट्यांची वाढ करेल आणि त्यामुळे लागवड क्षेत्रही वाढेल. सध्या कृषी होमिओपॅथीचा पुद्दुचेरीत केलेला प्रयोग चर्चेत आहे. या ठिकाणी संशोधकांनी शेतकर्यांसमवेत सेंद्रीय शेतीसह एक पाऊल पुढे टाकत होमिओपॅथी शेतीचा यशस्वी प्रयोग केला आहे. होमिओपॅथी उपचारामुळे एकीकडे पाण्याचा वापर कमी झाला आणि दुसरीकडे प्रदूषणही कमी झाले. शिवाय भूजलपातळीही वाढली. यापूर्वी कृषी क्षेत्रात होमिओपॅथीचा वापर शक्य आहे का, यासाठी २०१८ मध्ये प्रयोगास सुरुवात झाली होती.

# आयटीआय परिसरात चार चायनीज हातगाड्यांना आग

## आगीत हातगाड्यांवरील कच्चा माल, गॅस शेगड्या, टेबल, खुर्च्या जळून खाक

**प्रतिनिधी । जळगाव**

शहरातील शासकीय आयटीआय मुलींच्या वसतिगृहालगत रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या चार चायनीज हातगाड्यांना सोमवारी (दि.१९ जानेवारी) पहाटे सुमारे ३ वाजेच्या सुमारास अचानक आग लागल्याची खळबळजनक घटना घडली. या आगीत हातगाड्यांवरील कच्चा माल, गॅस शेगड्या, टेबल, खुर्च्या आदी साहित्य जळून खाक झाले आहे. यामुळे गरीब व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहावर मोठा घाला आला आहे.




दि.१९ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता जिल्हापेठ पोलीस स्टेशनचे विघ्नेश नाईक यांनी घटनेची माहिती दिल्यानंतर महापालिकेच्या अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. आयटीआय मुलींच्या वसतिगृहाच्या बाजूला असलेल्या चार चायनीज दुकानांना आग लागल्याचे निदर्शनास आले.या आगीत दिनेश जाधव, विजय सोनार, चंद्रकांत सोनार आणि मुस्कान टायर या चार हातगाडी मालकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.परिसरातून धुराचे लोट उठताना पाहून नागरिकांनी धाव घेतली. महापालिकेच्या अग्निशमन दलातील वाहन चालक व कर्मचाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी देविदास सुरवाडे, संतोष तायडे, वृषभ सुरवाडे, योगेश पाटील, विठ्ठल पाटील आणि चेतन सपकाळे यांनी आग विझवण्याच्या कामात मोलाची मदत केली.

दरम्यान, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, पीडित व्यावसायिकांनी हा प्रकार टवाळखोरांनी मुद्दाम केल्याचा संशय व्यक्त केला आहे.

विशेष म्हणजे, याच परिसरात यापूर्वीही दोन ते तीन वेळा अशाच प्रकारच्या आगीच्या घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे घातपाताचा संशय अधिक बळावला आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी व्यावसायिक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# विद्यापीठात २३ व २४ जानेवारीला आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**प्रतिनिधी । जळगाव**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा व पीएम उषा अंतर्गत दि. २३ व २४ जानेवारी रोजी बोध, मानवी बुद्धिमत्ता आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (कॉग्निजन ह्यूमन अँड आर्टिफिशियल इंटेलिजंट) या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी देश- विदेशातून तज्ञ वक्ते सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात दि.२३ रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल.माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन होणार आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नीती आयोगाचे वरिष्ठ सल्लागार व्ही.के. सिंग, विद्यापीठ अनुदान आयोगाचे सचिव प्रा.मनीष जोशी तर बीजभाषक म्हणून मलेशिया येथील आयएनटीआय इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे प्र- कुलगुरू खांग वेन गोह उपस्थित राहणार आहेत. तसेच राजेंद्र नन्नवरे, विद्यापीठाचे प्र - कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ विनोद पाटील उपस्थित राहणार आहेत. दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत वेगवेगळ्या सहा सत्रात आंतर राष्ट्रीय कीर्तीचे वक्ते मार्गदर्शन करणार आहेत.

# नशिराबादमध्ये जुन्या वादातून दोन गटांत तुफान हाणामारी

**प्रतिनिधी । जळगाव**

**तालुक्यातील नशिराबाद गावातील इस्लामपुरा परिसरात जुन्या वादाच्या कारणावरून दोन गटांत जोरदार हाणामारी झाल्याची घटना रविवारी (दि. १९ जानेवारी) दुपारी सुमारे ४ वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत दगड, विटा, लोखंडी सळई तसेच लाकडी दांडक्यांचा वापर करण्यात आला.**



याप्रकरणी परस्परविरोधात दोन्ही गटांतील एकूण ३१ जणांविरुद्ध नशिराबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहिल्या गटाकडून गुलाम गौस शेख अमीन (वय २३, रा. इस्लामपूरा, नशिराबाद) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, जुन्या भांडणाच्या कारणावरून अरफाद (पूर्ण नाव माहित नाही), हमीद शेख, मोईन शेख, बबलू शेख, अकीब शेख, गज्जू उर्फ गुलाम गोस, आवेश शेख, अबुजर शेख, हरीश शेख, रिजवान शेख, मुस्ताकीम शेख, ममदू शेख गनी, समीर शेख आदींनी बेकायदेशीर जमाव करून लोखंडी रॉड, लाकडी काठ्या व विटांनी गुलाम गौस शेख अमीन व त्यांच्या नातेवाईकांवर हल्ला केला. दुसऱ्या गटाकडून रिजवान रऊफ खान (वय २८, रा. नशिराबाद) यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, आसिफ सैय्यद, आमीन शेख बाबू, सलीम शेख बाबू, आरिफ अली आदींनी लोखंडी रॉड, विटा, दगडांनी हल्ला केल्याचे नमूद आहे.

# भगिरथ स्कूलचे उपशिक्षक डॉ.पारधे यांचा गौरव

**प्रतिनिधी । जळगाव**

येथील भगीरथ इंग्लिश स्कूलचे उपशिक्षक डॉ. अशोक पारधे यांना विद्यावाचस्पती पदवी प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. जिल्हापेठ पोनि प्रदीप ठाकूर यांच्याहस्ते हा गौरव सोहळा पार पडला. डॉ. अशोक पारधे हे गेल्या ३५ वर्षांपासून अखंड अध्यापन करत आहेत. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेऊन अनेक संस्थांनी त्यांना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये संस्कार रुजावेत या उद्देशाने ते साने गुरुजी कथामाला अंतर्गत शाळाशाळांत मोफत कथाकथन करतात. आजपर्यंत २० शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

# शासकीय चित्रकला परीक्षेत बहिणाबाई शाळेचे घवघवीत यश

**प्रतिनिधी । जळगाव**

**चित्रकला यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता ,आत्मविश्वास आणि कौशल्य वाढतात तसेच कलाकारांना प्रसिद्धी, व्यावसायिक संधी, नेटवर्किंग आणि नवनवीन कल्पना मिळतात ज्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होतो व त्यांच्या कलेला एक व्यासपीठ मिळते असे उद्गार संस्थेचे अध्यक्ष बंडूदादा काळे यांनी यावेळी व्यक्त केले.**



बहिणाबाई माध्यमिक विद्यालयात शासकीय चित्रकला स्पर्धेचा शंभर टक्के निकाल लागला असून परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेला विद्यालयातील एकूण ३७ विद्यार्थी बसले होते त्यापैकी एलिमेंटरी प्रकारात १७ विद्यार्थी व इंटरमिजिएट प्रकारात २० विद्यार्थी यांनी प्रथम श्रेणी मिळवून घवघवीत यश संपादन केले.

या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष बंडू दादा काळे, सचिव लीलाधर नारखेडे, जनार्दन रोटे, प्रतिभा खडके, मुख्याध्यापक डॉ. विलास नारखेडे यांच्या वतीने अभिनंदन, सत्कार करण्यात येऊन समाधान व्यक्त केले. सदरील यशस्वी विद्यार्थ्यांना विशाल पाटील सर यांचे अमूल्य मार्गदर्शन लाभले .यात मिलन महाले, उर्वशी कोळी, रागिनी तडवी, भैरवी निवतकर, खुशी सोनवणे, हर्षल पाथरवट, गौरी बोरसे, गुंजन बाविस्कर, भाविका पाथरवट, रोशनी राठोड इत्यादींनी यशस्विता मिळवली.

## पान १ वरुन

**संरक्षण उत्पादनात खासगी......**

गेले. त्यांनी दहशतवादी लक्ष्यांवर अचूक मारा केला. ज्यामुळे त्यांची क्षमता सिद्ध झाली आहे. त्यांनी नागास्त्राच्या अधिक प्रगत विकासित ड्रोनचे कौतुक केले. भविष्यात गरज पडल्यास ही शस्त्रे देशाच्या शत्रूंसाठी अत्यंत घातक ठरतील, असा विश्वासही सिंह यांनी व्यक्त केला. राजनाथ सिंह म्हणाले की, सोलर कंपनीद्वारे विकसित केल्या जात असलेल्या भार्गवास्त्र काउंटर ड्रोन प्रणालीची यशस्वी चाचणी खाजगी क्षेत्राची तांत्रिक क्षमता दर्शवते. ङ्गपिनाकाफ क्षेपणास्त्रांची निर्यात सुरू झाली असून ती भारताच्या संरक्षण उद्योगातील निर्यात क्षमता दर्शवते. भारत आता केवळ आयात करणारा नाही तर तो वेगाने निर्यातदार बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असेही ते म्हणाले.

**अखिल भारतीय किसान......**

शेकडो आदिवासी बांधव आंदोलनात सहभागी झाल्यामुळे अनेक मार्गावरील वाहतुकीला फटका बसला. नाशिक-वणी-मार्गे सापुतारा या मार्गावर बोरगाव येथे किसान सभेचे पदाधिकारी व कार्यकर्ते आंदोलनात उतरले. यामुळे वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे पोलिसांनी ती चिरई गावातून वळवल्याचे सांगण्यात आले. सुरगाणा, हरसूल भागातील रस्त्यांवर आंदोलन सुरू आहे. किसान सभेच्या आंदोलनामुळे पेठ ,निफाड, दिंडोरी, त्र्यंबकेश्वरमधील अनेक रस्त्यांवरील वाहतूक ठप्प झाल्याचे सुनील मालुसरे यांनी सांगितले. दरम्यान, आंदोलनामुळे काही मार्गावरील वाहतूक अन्य मार्गाने वळविली गेली असून ती संथपणे सुरू आहे. सोमवारी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी किसान सभेच्या प्रतिनिधींशी चर्चा केली.

**दहावी-बारावी परीक्षेत......**

घेतला आहे. मुख्याध्यापकांना केंद्र संचालक, कस्टोडियन तसेच पर्यवेक्षक यांना मोठ्या प्रमाणावर कामकाज करावे लागते तसेच शिक्षकांकडून उत्तरपत्रिका तपासण्याचेही काम असते. या पार्श्वभूमीवर मुख्याध्यापकांना उत्तरपत्रिका तपासणीसाठी देण्यात येणार नसल्याचेही त्यांनी त्यांनी सांगितले.

**धुळे महापालिकेत भाजपला......**

(सर्वसाधारण) प्रवर्गासाठी आरक्षित होते. त्या पार्श्वभूमीवर यंदा आरक्षण सर्वसाधारण, ओबीसी किंवा महिलांसाठी जाहीर होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मात्र, शासनाकडून अधिकृत घोषणा न झाल्याने या शक्यता सध्या चर्चेपुरत्याच मर्यादित आहेत. दरम्यान, सत्तास्थापनेच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या गटनेता निवडीकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे. भाजपकडे ५० नगरसेवकांचे भक्कम संख्याबळ असल्याने सत्तास्थापना निर्विवाद मानली जात असली, तरी गटनेता कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. पक्षातील सूत्रांच्या माहितीनुसार, येत्या एक ते दोन दिवसांत गटनेत्याची निवड होण्याची शक्यता असून, पक्षश्रेष्ठी व वरिष्ठ नेत्यांच्या संमतीने तसेच सर्व नगरसेवकांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला जाणार आहे. गटनेता निश्चित झाल्यानंतर भाजपकडून विभागीय आयुक्तांकडे सत्तास्थापनेचा अधिकृत दावा सादर केला जाणार आहे.

**भुसावळमध्ये ३० हजार लिटर्स......**

सुरू आहे. सदर ज्वलनशील पदार्थाचा साठा अधिकृत परवानगीने करण्यात आला आहे की बेकायदेशीररीत्या, तसेच तो कुठून आणण्यात आला व कुठे वितरित केला जाणार होता, याबाबत चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी पुरवठा विभाग व पोलीस संयुक्तपणे पुढील तपास करीत असून, दोषींविरुद्ध अत्यावश्यक वस्तू कायदा व इतर संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. घटनास्थळी उपस्थित असलेले कंपनी मालकाचे भाऊ अमीन इक्बाल तेली (रा. सुरत) यांची अधिकाऱ्यांनी चौकशी केली असता त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. त्यांच्या उत्तरांत सातत्याने विसंगती आढळून आल्याने पोलीस आणि पुरवठा विभागाचा संशय अधिक बळावला आहे. अमीन तेली यांनी संबंधित टँकर हा ट्रान्सपोर्टचा असून भाडे करारावर आणण्यात आल्याचे सांगितले.

**जळगावमधील गिरणा नदीवरील......**

मंजूर करण्यात आला आहे. हा पूल सुरतनागपूर राष्ट्रीय महामार्गावरील अत्यंत महत्त्वाचा दुवा असून, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील वाहतुकीसाठी तो निर्णायक ठरणार आहे. वाढत्या वाहतुकीचा ताण लक्षात घेता, या पुलाच्या बांधकामात अत्याधुनिक प्री-स्ट्रेस्ड कॉंक्रीट गर्डर तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे पूल अधिक मजबूत, टिकाऊ आणि दीर्घकाळ सुरक्षित राहणार आहे. या प्रकल्पामुळे जळगाव शहरातील दैनंदिन वाहतूक व्यवस्था अधिक गतिमान होईल, अपघातांचे प्रमाण कमी होईल तसेच व्यापार, उद्योग आणि दळणवळणाला चालना मिळून आर्थिक प्रगतीला वेग मिळेल, असा विश्वास खासदार स्मिता वाघ यांनी व्यक्त केला आहे. नागरिकांच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असून, जळगावच्या सर्वांगीण विकासात तो मैलाचा दगड ठरणार असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.

# निवडणूक निर्णय अधिकारी गोसावीसह गणापुरेंना बडतर्फ करा

**प्रतिनिधी । जळगाव**

मतमोजणी केंद्रावर सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली सुपारी घेतल्यासारखे काम करणारे निवडणूक निर्णय अधिकारी विनय गोसावी आणि पोलीस प्रशासनाने केलेल्या अमानुष मारहाणीचा शिवसेना (उबाठा)चे गजानन मालपुरे यांनी तीव्र शब्दांत निषेध केला आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांना तातडीने बडतर्फ करावे, अशी मागणी त्यांनी पत्रकार परिषदेत केली. मतमोजणी दरम्यान प्रभाग क्रमांक १० चे उमेदवार कुलभूषण पाटील आणि प्रभाग क्रमांक ८ चे उमेदवार मयूर कापसे यांनी फेरमतमोजणीसाठी अर्ज दिला होता. अवघ्या १५ ते ३० मिनिटांत ही प्रक्रिया पूर्ण होऊ शकली असती.

# हिंद-दी-चादर कार्यक्रमासाठी सामाजिक संघटनांनी पुढाकार घ्यावा : जिल्हाधिकारी

**प्रतिनिधी । जळगाव**

हिंद-दी-चादर अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी मोदी मैदान, नांदेड येथे भव्य-दिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व जिल्ह्यातील सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना, कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी केले. २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या देशव्यापी भव्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने नियोजन व योगदानाबाबत जिल्हाधिकारी श्री रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी शासन स्तरावर सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देत या कार्यक्रमाला केवळ धार्मिक नव्हे तर सामाजिक चळवळीचे स्वरूप देण्याचे आवाहन केले.



यापूर्वी मुंबई व नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या हिंद-की-चादर कार्यक्रमांना अपेक्षेपेक्षा मोठा प्रतिसाद लाभला असून नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास सुमारे १० लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे भाविकांच्या नांदेड येथे जाण्यासाठी व येण्याची व्यवस्थेचे सुसूत्र नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी बैठकीत नमूद केले.कार्यक्रमाच्या व्यापक प्रसिद्धीसाठी प्रशासनामार्फत सिनेमागृहांमध्ये जनजागृतीपर क्लिप्स दाखविणे, शाळांमध्ये प्रभात फेऱ्या, चित्रकला व फोटोग्राफी स्पर्धांचे आयोजन अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुढील टप्प्यात जिल्ह्यांमधून मोठ्या प्रमाणावर भाविकांना नांदेड येथे नेण्यासाठी वाहतूक, इंधन व अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सामाजिक संस्था,उद्योग यांनी मदत करावी असे जिल्हाधिकारी श्री. घुगे यांनी सांगितले.

# विद्यापीठातील योग प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात



**प्रतिनिधी । जळगाव**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे पौगंडावस्थेतील आदिवासी मुलींच्या शारिरीक व मानसिक स्वास्थावर योग व ध्यानाचा प्रभाव अभ्यासणे अंतर्गत मासिक रज:प्रवृत्तीच्या स्वास्थ्या संदर्भात योग प्रशिक्षण कार्यशाळेचा दि. १७ जानेवारी रोजी समारोपाच्या वेळी कुलसचिव डॉ. विनोद पाटील, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, सी.ए.डी.पी. प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक प्रा. किशोर विश्वकर्मा, डी.एस.टी. प्रकल्पाचे मुख्य अन्वेषक तथा योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील, शहादा बी.ए.आय.एफ. च्या प्रोग्रॅम मॅनेजर सोनाली सोनवणे, यावल प्रकल्पाच्या हर्षाली जावळे उपस्थित होते.

या प्रसंगी कार्यक्रमाचे अतिथी अरुण पवार यांनी त्यांच्या मनोगतात वारंवार मिळणाऱ्या विद्यापीठाच्या सहकार्याबद्दल प्रकर्षाने उल्लेख केला तसेच असे सामाजिक उपक्रम राबविल्या बद्दल त्यांनी विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाचे विशेष आभार मानले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी विद्यापीठ आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी नंदुरबारच्या शैक्षणिक ॲकॅडमी द्वारे स्थानिक गरजेनुसार विद्यार्थ्यांसाठी सोयीसुविधा आणि विशेषत: संशोधनावर नेहमीच अग्रेसर असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी विद्यार्थीनींना प्रेरणादायक एक गोष्ट सांगून उज्वल भविष्याचे योगप्रशिक्षक बनण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना प्रा.किशोर विश्वकर्मा यांनी सी.ए.डी.पी. आणि डी.एस.टी. प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रकल्पाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. लीना चौधरी यांनी तर आभार प्रदर्शन योगशास्त्र विभाग प्रमुख इंजि. राजेश पाटील यांनी केले. या प्रशिक्षणामध्ये मुख्यत: पौगंडावस्थेतील आदिवासीच्या मासिक रजककालीन समस्यांशी निगडीत शारीरिक व मानसिक स्वास्थ कसे जपावे, यावर प्रात्यक्षिके करून घेतली.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी **(मोबा.- ९९७००५३०६६)** व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
**✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी** (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### पतंगाच्या मांजाने गळा कापला; गुन्हा दाखल

**नंदुरबार ।** शहरातील उड्डाण पुलावर पतंगाच्या मांजामुळे दुचाकीस्वारचा गळा कापला गेल्याची घटना घडली. तालुक्यातील समशेरपूर येथील राजाराम सुदाम पटेल हे मोटारसायकलने दि. १८ रोजी सकाळी ११ वाजता सुमित हॉस्पिटलकडून गांधी पुतळयाच्या दिशेने जात होते. उड्डाण पुलावर अचानक पतंगाचा मांजा त्यांच्या गळयात अडकला. निष्काळजीपणे फेकून दिल्याने ही घटना घडली. यात राजाराम पटेल यांचा गळा कापला जावून ते गंभीर जखमी झाले. याप्रकरणी राजाराम पटेल यांच्या फिर्यादीवरून शहर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पो-लीस उपनिरीक्षक भुनेश मराठे करीत आहेत.

### शहरात दोन मोटारसायकलींची चोरी

**धुळे ।** शहरातून दोन वेगवेगळ्या भागातून दोन दुचाकी चोरी झाल्याची घटना घडली. शहर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्टेट बँक पार्किंगमध्ये जगदीश प्रल्हाद वरसाळे यांची दुचाकी चोरून नेली तर कोकणी हिल परिसरातून रोहित सोमनाथ शिंदे यांची दुचाकी चोरट्यांनी चोरून नेली. याबाबत शहर पोलीसात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहे. दुचाकी चोरट्यांचा शोध घ्यावा अशी मागणी होत आहे.

# बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कलश यात्रेचे उद्घाटन

## अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने करण्यात आले आयोजन

प्रतिनिधी । तळोदा

**अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, धुळे विभागाच्या वतीने सिनिअर महाविद्यालय, तळोदा येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित कलश यात्रा चे उद्घाटन तळोदा-शहादा विधानसभेचे आमदार राजेश पाडवी, अभाविप देवगिरी प्रदेशाचे नवनिर्वाचित प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे यांच्या हस्ते करण्यात आले.**



याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष रोहित माळी, प्राचार्य डॉ. हेमंत दलाल, शहर अध्यक्ष प्रा. आर. डी. मोरे, शहर मंत्री गितेश राजपूत सह विद्यार्थी तथा प्राध्यापक उपस्थित होते. या कलश यात्रेत झारखंड राज्यातील उलिहातु येथील भगवान बिरसा मुंडा यांच्या जन्मगावातून पवित्र मातीचा कलश आणण्यात आलेले आहे. या यात्रेच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडा यांचा संदेश तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा हाच उद्देश समोर ठेवून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ने भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्ताने या कलशात्रेचे आयोजन केले आहे. नंदुरबार, धुळे आणि जळगाव या तीन जिल्ह्यांमधून ११ तालुक्यांमध्ये, १५ महाविद्यालये आणि २५ वस्तीगृहांमधून ही यात्रा जाणार असून ३०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांपर्यंत भगवान बिरसा मुंडा यांचा संदेश पोहोचण्याचा उद्देश घेऊन विद्यार्थी परिषद ने कलश यात्रेचे आयोजन केले आहे. एवढेच नव्हे तर मार्गावरील खेड्यापाड्यांमध्ये नागरिकांमध्ये प्रतिमा पूजन करून १०००० पेक्षा जास्त नागरिकांपर्यंत भगवान बिरसा मुंडा यांचा संदेश पोहोचण्याचा उद्देश घेऊन विद्यार्थी परिषदेने या कलश यात्रेचे आयोजन केले आहे. या कलश यात्रेचे उद्घाटन दिनांक १९ जानेवारी रोजी तळोदा शहादा मतदार संघातील आमदार राजेश पाडवी यांच्या उपस्थितीमध्ये तळोदा येथील सीनियर महाविद्यालयमधून करण्यात आले. प्रमुख उपस्थिती म्हणून अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे हे उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष रोहित माळी, महाविद्यालयाचे प्राचार्य हेमंत दलाल, अभाविप शहराध्यक्ष प्रा. राजेंद्र मोरे, शहर मंत्री गितेश राजपूत उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक रोहित माळी यांनी केली. तसेच अभाविप देवगिरी प्रदेश मंत्री डॉ. वरूणराज नन्नवरे यांनी विद्यार्थी परिषदेचे मांडणी केली. त्यावेळी आमदार राजेश पाडवी यांनी यात्रेला शुभेच्छा देत विद्यार्थी परिषदेचे कौतुक केले. ज्या ज्या वेळेस देशांमध्ये संकटे येतात, त्या त्या वेळेस विद्यार्थी परिषद पुढाकार घेऊन आपले महत्त्वाची भूमिका बजावत असते असा संदेश समस्त उपस्थित छात्र शक्तीला दिला. अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ. हेमंत दलाल यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र मोरे यांनी मानले. या यात्रेच्या यशस्वितेसाठी नंदुरबार जिल्हा संयोजक साक्षी जगदाळे, रोहित माळी, कार्तिक तोमर, कमलेश राजपूत, गणेश गुरव यांनी मेहनत घेतली.

> नंदुरबार, धुळे आणि जळगाव या तीन जिल्ह्यांमधून ११ तालुक्यांमध्ये, १५ महाविद्यालये आणि २५ वस्तीगृहांमधून ही यात्रा जाणार असून ३०,००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांपर्यंत भगवान बिरसा मुंडा यांचा संदेश पोहोचण्याचा उद्देश

# शेतकऱ्यांना ठिबक सिंचन साहित्य वाटप

प्रतिनिधी । तळोदा

लुपिन ह्यूमन वेल्फेअर अँड रिसर्च फाउंडेशन तळोदा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या सुधारित कापूस आदर्श पद्धत या प्रकल्पाच्या माध्यमातून धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. शेतकऱ्यांकडून अल्प सहभाग रक्कम घेऊन ठिबक सिंचन साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत तळोदा तालुक्यातील तळवे, मोड, गोपाळपूर, नवागाव, सिलिंगपूर, रोजवा, खरवड, तऱ्हावद, रेवानगर, लाखापूर आदी गावांतील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचा लाभ देण्यात आला. सध्याच्या काळात पाण्याची टंचाई व बदलते हवामान लक्षात घेता योग्य पाणी व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. तसेच भविष्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी ही पद्धत उपयुक्त ठरणार आहे. या अनुषंगाने लुपिन फाउंडेशनमार्फत अल्प सहभाग रक्कम घेऊन ३३ शेतकऱ्यांना ठिबक सिंचन साहित्याचे वाटप करून मार्गदर्शन करण्यात आले. प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक सुनील सैंदाणे, कुशावर्त पाटील, समन्वयक चंदन टोक्षा तसेच पियू व्यवस्थापक धनसिंग पावरा यांनी प्रत्यक्ष मार्गदर्शन करून यशस्वीपणे राबविण्यात आला.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

प्रतिनिधी । बोराडी

किविप्र संस्था संचलित, बोराडी येथील मातोश्री बनुमाय कन्या माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा पंधरवड्यास सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाखाप्रमुख गणेश भामरे होते. याप्रसंगी विद्यालयातील मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या भावना भामरे, धैर्यशील चव्हाण, यांनी मराठी भाषेचे महत्त्व सांगुन मराठी भाषा संवर्धन करण्याचे आवाहन केले.

# विद्यार्थ्यांनी आध्यात्मिक शिक्षणाकडेही वळणे गरजेचे : आ.काशिराम पावरा

प्रतिनिधी । शिरपूर

**महाराष्ट्रात अनेक संत होऊन गेले, त्यामुळे महाराष्ट्राला संतांची भूमी म्हटले जाते. संतांनी आपल्याला शिकवण दिली आहे की, या युगात दोन प्रकारचे शिक्षण आहे. एक शिक्षण अध्यापक तर दुसरे आध्यात्मिक शिक्षण आहे. अध्यापक शिक्षणातून विद्यार्थी घडविला जातो, सर्व पदव्या मिळवू शकतो तर आध्यात्मिक शिक्षण महान संतांनी दिले आहे. परंतु आजच्या स्थितीत अध्यापक शिक्षण खूप वाढले आहे तर आध्यात्मिक शिक्षणाकडे कुणी वळलेले दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थानी आध्यात्मिक शिक्षणाकडेही वळणे गरजेचे आहे, असे मत आमदार काशीराम पावरा यांनी शिरपुरात दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.**



यावेळी आमदार काशीराम पावरा, महाराष्ट्र ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, नाशिक सहायक ग्रंथालय संचालक सचिन जोपुळे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, जि.प.चे माजी अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, नाशिक विभागीय ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. दत्ता परदेशी, धुळे जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष अविनाश भदाणे उपस्थित होते. यामुळे चैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते.

आर. सी. पटेल संस्थेचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शहरामधील केतकीबेन मुकेशभाई पटेल डिजिटल लायब्ररीत विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयाचे मोफत पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून दिली आहेत. एसव्हीकेएम संस्थेमार्फत वर्षाला ४ कोटी रुपये खर्च करून अत्याधुनिक सॉफ्टवेअर खरेदी करून जगातील प्रत्येक गोष्ट तिथे दिसायला मिळते, त्यामुळे या लायब्ररीला सर्वांनी भेट देण्याचे आवाहन केले.

यावेळी महाराष्ट्र ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये आता ग्रंथ महोत्सव होणार आहे. महोत्सवाला मागील महिन्यापासून सुरुवात झाली असून, नाशिक विभागात पहिला ग्रंथ महोत्सव घेण्याचा मान धुळे जिल्हा ग्रंथालयाने शिरपूर येथील आर. सी. पटेल संस्थेला देऊन पटकाविला असल्याचे सांगितले. तसेच यापूर्वी फक्त जिल्ह्याच्याच ठिकाणी ग्रंथ महोत्सव होत होते. प्रथमच तालुक्याच्या ठिकाणी ग्रंथ महोत्सव दिंडी काढून साऱ्यांना भारावून सोडले असल्याचेही त्यांनी सांगितले. उपनगराध्यक्षा संगीता देवरे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे सचिव रेषा पटेल, २ खजिनदार बबनलाल अग्रवाल, ट्रस्टी अतुल भंडारी, विजय अग्रवाल, डॉ. उमेश शर्मा, जगदीश पाटील, अनिल बाविस्कर, चंद्रशेखर ठाकूर, सुभाष अहिरे, अनिल सोनवणे, अविनाश भदाणे उपस्थित होते.

# धुळे जिल्हा रुग्णालयात मेनोपॉज क्लिनिकचा शुभारंभ

प्रतिनिधी । धुळे

**महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देत महाराष्ट्र सरकारने देशातील पहिल्या ममेनोपॉज क्लिनिकफउपक्रमाचा शुभारंभ केला आहे.**

राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांसह शहरी भागात ही केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. त्यानुसार धुळे जिल्हा रुग्णालयातही ममेनोपॉज क्लिनिकफ कार्यान्वित करण्यात आले असल्याची माहिती निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. रवी सोनवणे यांनी दिली आहे. महिलांच्या आयुष्यातील रजोनिवृत्तीचा (मेनोपॉज) काळ सुसह्य व्हावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

मेनोपॉज हा आजार नसून नैसर्गिक टप्पा असला, तरी या काळात महिलांना शारीरिक बदल, हार्मोनल असंतुलन, हाडांचे विकार आणि मानसिक तणावाचा सामना करावा लागतो.

ही गरज ओळखून एकाच छताखाली तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, मानसिक समुपदेशन, हृदय व हाडांची तपासणी आणि औषधोपचार उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

धुळे शहरातही हे क्लिनिक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्ता देगावकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यान्वित झाले आहे. महिलांचे आरोग्य सक्षम झाले, तरच कुटुंब आणि समाज सक्षम होईल, असे मत राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी व्यक्त केले. =या आरोग्यदायी सुविधेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभघ्यावा, असे आवाहन डॉ. दत्ता देगावकर यांनी केले आहे.

# जिजामाता महाविद्यालयाच्या खेळाडूंची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी । नंदुरबार

पालघर येथे झालेल्या खेलो इंडीया ट्रायबल गेम्स राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत जिजामाता महाविद्यालयाने यश संपादन केले आहे. त्यामुळे यशस्वी खेळाडूंची १४ फेब्रुवारी रोजी छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिजामाता शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नंदुरबार येथील इंडिया ट्राइबल गेम्स २०२५-२६ मध्ये पोलीस ग्राउंड पालघर येथे झालेल्या क्रीडा राज्यस्तरीय स्पर्धेत बी.ए. चा तुषार अपसिंग पाडवी या विद्यार्थ्याने अँथलेटिक्स हार्डल प्लेयर्स ११० मीटर स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. बी.ए. ची सोकी पावरा या विद्यार्थिनीने १० की.मी. धावणे स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. या दोन्हीही विद्यार्थ्यांचे छत्तीसगड येथे होणाऱ्या दि. १४ फेब्रुवारी रोजी खेलो इंडिया ट्राइबल स्पर्धेसाठी राष्ट्रीय पातळीवर निवड झाली आहे.

# अस्थिरोग निदान शिबिरात १०४ नागरिकांची तपासणी

प्रतिनिधी । धुळे

**वाडीभोकर रोड परिसरात स्व. बापूसाहेब नामदेवराव ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून मोफत आरोग्य निदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये परिसरातील १०४ ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या हाडांमधील कॅल्शियमची पातळी तपासून घेतली.**



या आरोग्य शिबिराचे उद्घाटन प्रभाग क्रमांक ८ च्या नवनिर्वाचित नगरसेविका उज्वला अनिल ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश ठाकरे आणि शालिनी ठाकरे उपस्थित होते.

मान्यवरांनी बापूसाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस अभिवादन करून शिबिराची सुरुवात केली. तज्ज्ञ डॉक्टरांनी केले शिबिरात मार्गदर्शन शिबिर यशस्वी करण्यासाठी मनोज घोडके, किशोर पाटील, कुणाल परदेशी आणि कर्मचारी वृंदाने विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी वाडीभोकर रोड आणि देवपूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढत्या वयात हाडांचे आरोग्य सुदृढ राहणे गरजेचे असते, याच उद्देशाने या शिबिरात ज्येष्ठ नागरिकांची बीएमडी चाचणी करण्यात आली. डॉ. योगेश ठाकरे आणि डॉ. कीर्ती ठाकरे यांनी हाडांच्या आरोग्याविषयी मोफत सल्ला दिला.

# धुळे महापालिका निवडणुकीत २१ हजार मतदारांनी उमेदवारांना नाकारले

प्रतिनिधी । धुळे




सार्वत्रिक महापालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी मोठ्या प्रमाणावर नोटा (यापैकी एकही नाही) पर्याय निवडत उमेदवारांविरोधात नाराजी व्यक्त केली.

शहरातील १९ प्रभागांमध्ये एकूण २१ हजार ४३४ मतदारांनी नोटा वापरल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. १९ प्रभागांतील ७४ जागांसाठी निवडणूक झाली. त्यापैकी चार जागा बिनविरोध ठरल्या होत्या. उर्वरित जागांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान झाले.

प्रशासनाच्या जनजागृतीनंतरही शहरात सरासरी ५६ टक्के मतदान नोंदले गेले. १६ जानेवारीला झालेल्या मतमोजणीत धुळे महानगरपालिका भाजपाला ५० जागा मिळून बहुमत सिद्ध झाले. एमआयएम दहा, राष्ट्रवादी (अजित पवार गट) आठ, शिवसेना (शिंदे गट) पाच, तर एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे. नोटा वापरात प्रभाग क्रमांक ९ आघाडीवर असून येथे दोन हजार ७५० मतदारांनी उमेदवारांना नाकारले आहे. त्याखालोखाल प्रभाग ५ (दोन हजार २२०), प्रभाग १६ (एक हजार ६००), प्रभाग २ (एक हजार ५६२) आणि प्रभाग १० (एक हजार ५२०) येथेही नोटाचा मोठा वापर झाला. तर प्रभाग १४ (२९५), प्रभाग १७ (३८१) आणि प्रभाग १९ (४४२) जणांनी उमेदवाराला नाकारले आहे. स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष, अपेक्षित उमेदवारांचा अभाव, पक्षांतर्गत मतभेद व राजकीय व्यवहारांवरील अविश्वास यामुळे नोटाचा कल वाढल्याचे मत जाणकार व्यक्तींकडून व्यक्त होत आहे. काही प्रभागांमध्ये उमेदवारी लादल्याची भावना असल्याने मतदारांनी निषेध म्हणून नोटाचा पर्याय स्वीकारल्याचेही बोलले जात आहे.

नोटाला विजय मिळत नसला, तरी मतदारांचा असंतोष नोंदविण्याचे हे प्रभावी माध्यम ठरत आहे. २१ हजारांहून अधिक नोटा ही आकडेवारी आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज अधोरेखित करते.

# नवापूरमध्ये शिक्षणक्षेत्र, मुख्य बसस्थानक परिसरात नशेचा बाजार

## व्यसनाधिनतेने घुसखोरी केल्याचे धक्कादायक चित्र समोर; पालक व प्रशासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज

प्रतिनिधी । नवापूर

**नवापूर शहरात ग्रामीण भागातून दरवर्षी हजारों विद्यार्थी शिक्षणासाठी मोठ्या आशेने दाखल होतात. मात्र, शिक्षणाच्या या पवित्र क्षेत्रात सध्या व्यसनाधीनतेने घुसखोरी केल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. काही विद्यार्थी प्रामाणिकपणे शिक्षण घेत असले तरी अनेक विद्यार्थी गांजा, सिगरेट, दारू व गुटख्याच्या आहारी जात असल्याने त्यांचे भवितव्य अंधारात जात आहे. शनिवारी भरत असलेल्या नवापूरच्या आठवडे बाजाराच्या दिवशी शिक्षणाऐवजी मनशेचा बाजारफभरत असल्याचे वास्तव समोर आले आहे.**

शहरातील मुख्य बस स्थानक परिसर तसेच त्यामागील भाग सध्या नशेखोरांचे केंद्र बनल्याचे दिसून येत आहे. शाळा व महाविद्यालय सुरू होण्यापूर्वी आणि सुटल्यानंतर अनेक विद्यार्थी टोळक्याने येथे बसलेले आढळतात. धक्कादायक बाब म्हणजे हे विद्यार्थी उघडपणे सिगरेट व



गांजा ओढताना दिसून येत आहेत. बस स्थानकासमोरील दुकानांच्या पाठीमागे असलेल्या जिन्यांवर शालेय विद्यार्थी नियमितपणे सिगरेट व गांजा ओढत असल्याचे चित्र आहे. शिक्षणासाठी पाठवलेली मुले नेमकी काय करत आहेत, याकडे पालकांचे लक्ष नसल्याचे प्रकषनि जाणवते. त्यामुळे विद्यार्थ्यांना तातडीने समुपदेशनाची नितांत गरज निर्माण झाली आहे.शहराच्या मध्यवस्तीत व सार्वजनिक ठिकाणी अमली पदार्थाचे खुलेआम सेवन होत असताना पोलीस प्रशासनाने गंभीर दखल घेणे आवश्यक आहे. या परिसरात पोलिसांची गस्त वाढवून नशा करणाऱ्या विद्यार्थ्यांवर तसेच त्यांना नशा पुरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे. सर्रास गांजा विक्री सुरू असल्याच्या चर्चानाही आळा घालणे गरजेचे आहे. वेळीच या नशेखोरीला पायबंद घातला नाही, तर नवापूरचे शैक्षणिक वातावरण पूर्णतः दूषित होऊन तरुण पिढी उद्धस्त होण्याचा धोका आहे. परिणामी गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याचीही शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे प्रशासनासोबतच पालकांनीही आपल्या पाल्यांवर सतत मवॉचफ ठेवणे ही काळाची नितांत गरज बनली आहे.

> ग्रामीण भागातील आई वडील पोटाला चिमटा काढून, उन्हातान्हात कष्ट करून मिळालेल्या पैशातून आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करतात. मात्र, आपला मुलगा खरोखर शाळेत जातोय का? तो कोणाच्या संगतीत आहे? शाळा सुटल्यावर वेळेवर घरी येतो का? याची खातरजमा पालकांनी करणे अत्यंत गरजेचे जबाबदारी संपत नाही, अन्यथा शिक्षणाच्या नावाखाली झाले आहे. केवळ शाळेत नाव टाकले म्हणजे पालकांची मुले कायमची व्यसनाच्या गर्तेत अडकण्याची दाट शक्यता आहे. शाळा व महाविद्यालयांत मूल्यशिक्षण आणि व्यसनमुक्तीबाबत जागृती करणेही काळाची गरज ठरली आहे.

# चोपडा तंत्रनिकेतन महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

## तृतीय वर्ष संगणक विभागाची अनन्या पाटील ९६.३५% गुण मिळवत महाविद्यालयातून प्रथम



प्रतिनिधी । चोपडा

**येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळ संचलित, श्रीमती शरच्चंद्रिका सुरेश पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इंजिनिअरिंग पॉलिटेक्निक महाविद्यालयात दि.१९ रोजी हिवाळी २०२५ परीक्षेत घवघवीत यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.**

या सोहळ्यात हिवाळी २०२५ च्या परीक्षेत विविध शाखांमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यात विद्यार्थिनी अनन्या पाटील तृतीय वर्ष संगणक विभाग ९६.३५% गुण मिळवत महाविद्यालयातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. तसेच स्थापत्य विभागातून हार्दिक पटेल ८६.१२% प्रथम व विद्युत विभागातून मयूर सुतार ९३.०६% प्रथम, यांत्रिकी विभागात गुणवंत सावळे ८५.८२% प्रथम आले. कार्यक्रमात पालक प्रतिनिधी दिपाली पाटील व रत्नाकर फेगळेकर, एम.एस. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्राचार्य व्ही. एन. बोरसे यांनी विद्यार्थी व पालकांना सांगितले की, विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या मेहनतीचे, सातत्याचे व योग्य मार्गदर्शनाचे फलित आहे. आमचे प्राध्यापकवर्ग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील आहेत. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अँड. संदीप पाटील, संस्थेच्या सचिव डॉ. स्मिता पाटील यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवृंद, कार्यक्रमाचे समन्वयक धनराज पाटील, रोहित शिंदे, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.पी.के. चौधरी यांनी केले.

# पोलिसावर हल्ला : आरोपीस पकडण्यात अखेर यश

प्रतिनिधी । भुसावळ

**येथील इराणी मोहल्यात संशयित आरोपीस पकडण्यासाठी मध्यप्रदेश पोलिसासह गेलेल्या बाजारपेठ पोलिसांवर विटा व काठ्यांचा हल्ला झाल्याची घटना गुरुवारी रात्री घडली. याबाबत १६ संशयितांवर बाजारपेठ पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, मध्यप्रदेशातील बडोदा येथील गुन्ह्यातील संशयित भुसावळ येथील रहिवासी करार अली हुजूर अली याला पकडण्यासाठी मध्यप्रदेश पोलिसांनी बाजारपेठ पोलिसांच्या मदतीने मुस्लिम कॉलनीत पाण्याच्या टाकीजवळ रात्री ११ वाजेच्या सुमारास पथक गेले असता संशयितासह त्यांच्या नातेवाईकांनी बेकायदेशीर जमाव जमवून लाकडाचे दांडके, काठ्या व विटांनी पोलिसांवर जोरदार हल्ला चढवला होता. यात काही पोलीस जखमी झाल्याचे वृत्त असून संशयित आरोपीस पसार करण्याचा प्रयत्न पोलिसांच्या तत्परतेने फसला व आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेऊन मध्यप्रदेश पोलिसांच्या स्वाधिन केला आहे.

या हल्ल्यात पोलीस कॉन्स्टेबल शुभम जोशी व इतर काही कर्मचारी जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. याबाबत शुभम जोशी यांनी १६ जानेवारी रोजी बाजारपेठ पोलीस स्टेशनमध्ये दिलेल्या फिर्यादीवरून मंजू जुल्फोकार अली, बाबर इराणीची पत्नी राजमा तालीम, तालीमची बहीण उसणारा, मरियम जाफर इराणी, मतारी करार अली, सुकीना हसनन अली, नजिया टिपू उंदरी, कनिजा हुजूर अली, कुमेर अब्बास, करार अली व इतर संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## थोडक्यात

### दळवेल परिसरात झाडाला दोरी बांधून एकाने घेतला गळफास

**पारोळा ।** पारोळा तालुक्यातील दळवेल परिसरात शेतात झाडाला दोरी बांधून गळफास घेतलेल्या अवस्थेत ५८ वर्षीय शेतकरी आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. बाळू कौतिक पाटील (वय ५८, रा. दळवेल, ता. पारोळा) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून रविवारी (दि. १८) सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. मिळालेल्या माहितीनुसार, बाळू पाटील हे सकाळी सुमारे पाच वाजता शेतात गेले होते. मात्र सकाळी आठ वाजेपर्यंत ते घरी न परतल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला. यावेळी शेतातील निंबाच्या झाडाला दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत ते आढळून आले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी तातडीने त्यांना खासगी वाहनाने पारोळा येथील कुटीर रुग्णालयात दाखल केले. मात्र तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. घटनेची नोंद पारोळा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# चोपडा नगरपालिका सभापतींची निवड बिनविरोध









प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा नगरपरिषदेच्या स्थायी व विषय समित्यांची सभापती पदांची निवड पीठासन अधिकारी तथा तहसीलदार भाऊसाहेब राऊत यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच होऊन स्थायी समिती सभापतीपदी नगराध्यक्ष नम्रता सचिन पाटील यांची तर बांधकाम समिती सभापती पदी हुसेन खाँ अय्युब खाँ पठाण यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे तसेच इतर समिती सभापतींची ही निवड घोषित करण्यात आली आहे.**

नगरपालिका सभागृहात सकाळी ११ वाजता पीठासन अधिकारी तहसीलदार भाऊसाहेब राऊत यांच्याकडे स्थायी व विशेष समिती सभापतींचे नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर प्रत्येकी एकच आल्याने बिनविरोध स्थायी समिती सभापतीपदी नम्रताताई सचिन पाटील तर बांधकाम सभापतीपदी हुसेन खाँ अय्युब खाँ पठाण, शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापती पदी अमोल साहेबराव पाटील, स्वच्छता वैद्यक आणि आरोग्य समिती सभापतीपदी रमेश ग्यानोबा शिंदे, पाणीपुरवठा व जल निस्सारण समिती सभापतीपदी किशोर रघुनाथ चौधरी, नियोजन व विकास समिती सभापतीपदी उपनगराध्यक्ष पंकज सुरेश बोरोले आणि महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी देवयानी पवन माळी यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी नम्रता सचिन पाटील उपाध्यक्ष पंकज सुरेश बोरोले गटनेता योगेश उर्फ पियुष राजेंद्र चौधरी, गटनेते रमाकांत नथू ठाकूर, गटनेते गजेंद्र अरविंद जैस्वाल, गटनेते हितेंद्र रमेश देशमुख यांच्यासह ३४ सदस्य हजर होते. तसेच मुख्याधिकारी रामनिवास झवंर, उप मुख्याधिकारी संजय मिसर, सभा अधीक्षक संजय ढमाळ, अनिल चौधरी तसेच सर्व विभाग प्रमुख व नगरसेवक मोठ्या संख्येने हजर होते.

## राष्ट्रीय योगासन स्पर्धेत आर्टिस्टिक पेअरमध्ये महाराष्ट्र आघाडीवर

जळगाव – अनुभूती स्कूलमध्ये सुरू असलेली राष्ट्रीय योगासन स्पर्धा रोमांचक स्थितीत असून आर्टिस्टिक पेअरमध्ये महाराष्ट्र राज्याचा संघ आघाडीवर आहे. त्यासोबत आर्टिस्टिक एकलमध्ये पश्चिम बंगाल, आर्टिस्टिक ट्रेडिशनलमध्ये सीआयएससी कौन्सील बोर्ड पुढे आहे. शरीर, श्वास आणि साधनेचा अद्वितीय दर्शन स्पर्धक घडवित आहे, या स्पर्धतुन आज अंतिम विजेत्या ठरणार आहे. अनुभूती निवासी स्कूलमध्ये सुरू असलेली मुलींची १७ वर्षाखालील ६९ वी नॅशनल स्कूल गेम्स राष्ट्रीय योगासन स्पर्धेत ३३ संघ राष्ट्रीय योगासन स्पर्धेसाठी अनुभूती निवासी शाळेत आले आहेत.

# पारोळा नगरपरिषद विषय समिती निवड बिनविरोध



प्रतिनिधी । पारोळा

**नगरपरिषद विषय समित्यांच्या सदस्यांची बिनविरोध निवड नगरपालिका सभागृहात सोमवार दि.१९ रोजी सकाळी ११ वाजता पिठासन अधिकारी तथा पारोळा तहसिलदार डॉ. उल्हास देवरे यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याधिकारी तुषार नेरकर, लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत बी. पाटील व उपाध्यक्ष रोहन मोरे यांच्या उपस्थितीत नगरसेवकांची बैठक घेण्यात आली.**

यावेळी नगरपालिकेच्या विविध विषय समित्यांच्या सदस्यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून स्थायी समिती सभापतीपदी लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील व सभासदपदी रोहन मोरे, मंगेश तांबे, निर्मला वाणी, कविता मिस्त्री, पल्लवी जगदाळे, भूषण टिपरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असून नियोजन व विकास समिती सभापतीपदी अॅड. रोहन मोरे व सदस्यपदी नरेंद्र पाटील, राजेंद्र पाटील, अमृत चौधरी, प्रमोद कासार यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच स्वच्छता वैदिक आणि सार्वजनिक आरोग्य समिती सभापतीपदी मंगेश तांबे व तसेच सदस्यपदी अमोल शिरोळे, माधुरी पवार, राजेंद्र कासार, मनीषकुमार पाटील यांची निवड सुचित करण्यात आली आहे. तसेच महिला व बालकल्याण समितीमध्ये सभापतीपदी निर्मला वाणी व समिती सदस्यपदी स्मिता पाटील, मंगलाबाई चौधरी, किरण पाटील, भाग्यश्री अनुष्ठान, हमीदबी शेख सलीम यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम समितीमध्ये सभापती कविता मिस्तरी व तसेच सदस्य म्हणून नितीन दत्तात्रय सोनार, पंकज मराठे, अलका महाजन, गोपाल दाणेज, यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षण क्रीडा व सांस्कृतिक कार्य समिती सभापतीपदी भूषण टिपरे व तसेच सदस्यपदी भाग्यश्री अनुष्ठान, हमीदाबी शेख सलीम, सुवर्णा पाटील, माधुरी पवार यांची निवड करण्यात आली. तसेच पाणीपुरवठा व जल निस्सरण समिती सभापतीपदी पल्लवी जगदाळे तसेच सदस्यपदी विवेक पाटील, वंदना शिरोळे, राजेंद्र पाटील, बेलदार नजीरखान हमिद खान यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

याप्रसंगी बांधकाम अभियंता सुमित पाटील, लेखापाल दीपक महाजन, सभा अधीक्षक किशोर चौधरी, शहर तांत्रिक कक्ष अधिकारी भूषण महाजन, सतीश चौधरी, संजय घुले, गणेश माळी, कैलास वानखेडे, इत्यादी उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मुख्याधिकारी तुषार नेरकर यांनी केले.

## दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीत घोटाळा उघड; जिल्हा परिषदेच्या आणखी चार कर्मचाऱ्यांचे निलंबन

प्रतिनिधी । जळगाव

राज्य शासनाच्या दिव्यांग सक्षमीकरण व दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशानुसार राज्यभर सुरू असलेल्या दिव्यांग कर्मचारी व दिव्यांग व्यक्तींच्या प्रमाणपत्र तपासणी मोहिमेत जळगाव जिल्हा परिषदेत मोठा प्रकार उघडकीस आला आहे. दिव्यांग प्रमाणपत्रातील टक्केवारीत नियमबाह्य तफावत आढळून आल्याने जिल्हा परिषदेतील आणखी चार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यामुळे आतापर्यंत निलंबित कर्मचाऱ्यांची संख्या आठवर पोहोचली असून, ही कारवाई जिल्हा परिषद प्रशासनासाठी धक्कादायक मानली जात आहे.

राज्य शासनानेखऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांना न्याय मिळावा, या उद्देशाने राज्यभर तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत जळगाव जिल्हा परिषदेच्या विविध आस्थापनांवर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दिव्यांग प्रमाणपत्रांची सखोल तपासणी सुरू आहे. तपासणीदरम्यान वैद्यकीय अहवाल, टक्केवारीचे निकष, तसेच प्रमाणपत्र जारी प्रक्रियेतील कागदपत्रांची बारकाईने पडताळणी करण्यात येत आहे.

या तपासणीत भालचंद्र नारायण पवार, आरोग्य सहाय्यक (जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जळगाव), छाया घनश्याम भोळे, आरोग्य सहाय्यक (प्राथमिक आरोग्य केंद्र वाघोड), संदीप विनायक सोनवणे, आरोग्य सेवक (प्राथमिक आरोग्य केंद्र तरवडे, ता. चाळीसगाव) आणि गणेश मुरलीधर महाजन, आरोग्य सहाय्यक (पिंपरखेड, ता. भडगाव) यांच्या दिव्यांग टक्केवारीत निकषांनुसार तफावत आढळून आली. त्यानुसार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी बुधवार, दि. १४ जानेवारी रोजी या चौघांविरुद्ध तात्काळ निलंबनाची कारवाई केली.

# वकृत्व, नेतृत्व व कर्तुत्वाचा पाठ गिरविणारे आदर्श शिक्षक दत्तू गुरुजी



> शाळा म्हटली की नुसता फळा, खडू अन् पाटी एवढेच गणित नसून ती म्हणजे मनुष्य घडविण्याचा कारखाना... एक एक साच्यात पक्का भाजला जावून बाहेर निघणारा लखलखीत दागिना म्हणजे विद्यार्थी होय... त्याला टप्प्या टप्प्यात आकार देऊन चमकविणारा खरा शिल्पकार असतो तो शिक्षक... अशाच एका आदर्श सेवा निवृत्त शिक्षकांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे विषयी दोन शब्द..!

शब्दांकन

**महेश शिरसाठ**
(पत्रकार) चोपडा, जि.जळगाव

चोपडा शहरात आदर्श व्यक्तिमत्व म्हणून पाहिले जाणारे शैक्षणिक वादळ म्हणून ओळख असलेले सेवा निवृत्त शिक्षक म्हणजे श्री. दत्तात्रेय धनगर ऊर्फ दत्तू गुरुजी होय. त्यांचा आज वाढदिवस. त्यांनी महिला मंडळ शाळेत शिक्षक पासून ते मुख्याध्यापक पर्यंत अत्यंत सोपासकाराने विद्यार्थी घडवण्यात अनमोल वाटा घेतला आहे. त्यांच्या या श्रमामुळे अनेक विद्यार्थी नामवंत पदावर सेवा बजावीत आहे अशा या निस्पृह, निधर्मी तन, मन व धनाने स्वतःस झोकून घेत नुसते पुस्तकी ज्ञान न देता जीवनाचा सारीपाट शिकविणारा मास्तर म्हणून त्यांची ख्याती आहेत. कर्तुत्व, वकृत्व व नेतृत्व या तिघांचा मेळ घालण्याचे धडे रुजवत विद्यार्थ्यांची दशा बदलवून दिशा देण्याचे होकायंत्राचे काम त्यांनी केले आहे. शिक्षण म्हणजे वाघीणीचे दुध आणि पिणारा गुरगुरल्या शिवाय राहणार नाही याची खऱ्या अर्थानं प्रचिती देण्यात त्यांनी कुठलीही कसर सोडली नाही. त्यामुळेच त्यांचे उच्च पदावर गेलेले शिष्य आजही गुरु भेटीला आल्या शिवाय राहत नाहीत. श्री.दत्तात्रेय धनगर गुरुजींना आपल्या उत्कृष्ट सेवेबद्दल सन १९९९ मध्ये जैन संघटना जळगाव मार्फत आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे तसेच सन २००० मध्ये जिल्हा परिषद जळगाव ने देखील आदर्श शिक्षक पुरस्कार देऊ सन्मान केलेला आहे. त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद, धनगर पंच मंडळ, खाजगी प्राथमिक शिक्षक संघ, ज्येष्ठ नागरिक संघ आदि संस्थावर पदे भूषवीत समाजसेवा बजावली आहे. राजकीय,सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे उल्लेखनीय काम आजही पहावयास मिळत आहे.

त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देत उत्तम मार्गदर्शक म्हणून ख्याती मिळवली आहे. केवळ पुस्तकी ज्ञान न देता नैतिक मूल्ये, चांगल्या सवयी आणि आयुष्यभराची शिकण्याची आवड निर्माण करण्यात त्यांची हातोटी आहे.

शिक्षक समाजात विद्यार्थी घडविण्यात कुंभाराचे काम करीत असतात त्यामुळे ते उत्तम शिल्पकार ठरतात आणि त्यांना कर्मचारी न मानता एक आदर्श व्यक्ती म्हणून पाहणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. शिक्षकांमध्ये संवाद, सहानुभूती आणि संयम यांसारखे गुण असणे आवश्यक आहे, तेविद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचण्यास मदत करतात आणि सर्जनशीलता विकसित करण्याची आणि समस्या सोडवण्याची क्षमता देतात. ते विद्यार्थ्यांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि आयुष्यात पुढे जाण्यासाठी प्रेरणा देतात, तसेच त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देतात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये चांगले विचार, सदाचार, सदभावना आणि जबाबदार नागरिक घडण्यासाठी मोलाचे कार्य केले जाते असे प्रगल्भ विचार गुरुजींच्या ठायी आहेत.विशेष म्हणजे संगीत शिक्षक,उत्कृष्ट तबला व डोलकी वादक म्हणून चोपड्यात त्यांचा नाव लौकीक आहे.

बदलत्या काळाप्रमाणे स्वतःला आणि शिकवण्याच्या पद्धतींना अनुकूल बनवणे महत्वाचे सांगून विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करताना कधीही कोणताही भेदभाव न ठेवता शिक्षण देणे गरजेचे आहे.मात्र आज तशी परिस्थिती जाणवतं नसल्याची खंत ते व्यक्त करतात. एव्हढे मात्र खरे...!

# प्रा.डॉ.राहुल निकम यांना राज्यस्तरीय पुरस्कार

## • मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक गुणवंत शिक्षक पुरस्कार

प्रतिनिधी । चोपडा

**भगिनी मंडळ चोपडा संचलित समाजकार्य महाविद्यालय, चोपडा येथील प्रा.डॉ. राहुल निकम यांना जळगाव येथे आयोजित समता शिक्षक परिषदेत मान्यवरांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय महात्मा फुले सत्यशोधक गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.**



परिषदेच्या अध्यक्षस्थानी समता शिक्षक परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डी. के. अहिरे होते. प्रमुख मान्यवर नासिक विभाग शिक्षक आमदार किशोर दराडे होते. प्रमुख व्याख्याते ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे, पत्रकार किरण सोनवणे, समता शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भरत शिरसाट आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. राहुल निकम राहुल निकम हे गेल्या अनेक वर्षापासून शिव, शाहू, फुले आंबेडकर यांची विचारधारा आणि भारतीय संविधानाची मूल्ये समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्य करीत आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदेच्यावतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सरांच्या या कार्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे माजी विधानसभा अध्यक्ष अरुण गुजराथी, प्रथितयश उद्योगपती आशिष गुजराथी, समता शिक्षक परिषदेचे प्रदेशाध्यक्ष भरत शिरसाट, सामाजिक कार्यकर्ते प्रा. अशोक पवार, गौतम मोरे, अशोक बिऱ्हाडे, समता शिक्षक परिषदेचे जळगाव जिल्हाध्यक्ष (प.वि.) भैय्यासाहेब सोनवणे, अजय भामरे, बापूराव ठाकरे, सोपान भवरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.